# Manual - 17



(ख) "कलम" याचा अर्थ, अधिनियमाचे कलम, असा आहे;

(ग) या नियमांमध्ये वापरण्यात आलेले परंतू व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना, त्या अधिनियमामध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमून दिलेले असतील, तेच अर्थ असतील;

**३. माहिती मिळविण्याची कार्यपध्दती -** कलम ६ च्या पोट-कलम (१) अन्वये माहिती मिळविण्यासाठीचा विनंती अर्ज, संबंधित राज्य जनमाहिती अधिकाऱ्याकडे साध्या कागदावर जोडपत्र (अ) मध्ये दिलेल्या नमुन्यात करण्यात येईल, आणि त्यासोबत सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली रुपये दहा इतकी अर्ज फी, रोख रकमेच्या स्वरुपात, तिची योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्षाव्दारे किंवा बँकेच्या धनादेशाव्दारे जोडण्यात येईल किंवा त्यावर दहा रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिटकविण्यात येईल.

**४. माहितीबद्दलची फी -** (१) कलम ७ च्या पोट-कलम (१) अन्वये माहिती पुरविण्यासाठी, सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरुपात, तिची योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धानादेश या स्वरुपात किंवा मनी ऑर्डरच्या स्वरुपात पुढील दर्शनी आकारण्यात येईलः-

(अ) (क) संबंधित विभागाने विशिष्ट दस्तऐवज, नकाशे इत्यादींची किंमत अगोदरच निश्चित केली असेल त्याबाबतीत,

(ख) माहिती छायांकित प्रतींच्या स्वरुपात किंवा अन्य (प्रतींच्या) स्वरुपात चटकन मिळण्याजोगी असेल त्याबाबतीत. अशी निश्चित केलेली किंमत अधिक टपाल खर्च.

(एक) तयार केलेल्या किंवा छायांकित केलेल्या प्रत्येक पृष्ठासाठी

(ए-४ किंवा ए-३ आकारातील कागद) दोन रुपये अधिक टपाल खर्च, किंवा

(दोन) मोठया आकारातील कागदाच्या प्रतींचा प्रत्यक्ष आकार किंवा परिव्यय किंमत अधिक टपाल खर्च.

(ब) अभिलेख पाहण्यासाठी, पहिल्या तासाकरिता कोणतीही फी नाही, आणि त्यानंतरच्या प्रत्येक पंधरा मिनिटांकरिता (किंवा त्यांच्या भागाकरिता) रुपये पाच इतकी फीः

परंतु, अर्जदार त्यक्तिशः येऊन माहिती घेउुन जाईल, त्याबाबतीत कोणताही टपाल खर्च आकारण्यात येणार नाही.

(२) कलम ७ च्या पोट-कलम (५) अन्वये माहिती पुरविण्यासाठी, सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली फी, रोख रकमेच्या स्वरुपात, तिची योग्य पावती देऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरुपात किंवा मनी ऑर्डरच्या स्वरुपात पुढील दर्शनी आकारण्यात येईलः-

(क) डिस्केटस् किंवा फ्लॉपी या स्वरुपातील माहिती पुरविण्यासाठी प्रत्येक डिस्केटस् किंवा फ्लॉपीकरिता पन्नास रुपये अधिक टपाल खर्च; आणि



(ख) मुद्रित स्वरुपातील माहिती पुरविण्यासाठी, अशा प्रकाशनासाठी निश्चित केलेली किंमत किंवा त्या प्रकाशनातील उताऱ्यांच्या प्रत्येक छायांकित पृष्टासाठी दोन रुपये अधिक टपाल खर्चः

परंतु अर्जदार व्यक्तिशः येऊन माहिती घेऊन जाईल त्याबाबतीत, कोणताही टपाल खर्च आकारण्यात येणार नाही.

**५. अपील -** (१) कलम ७ च्या पोट-कलम (१), किंवा पोट-कलम (३) च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत निर्णय मिळाला नसेल अशा किंवा राज्य जन माहिती अधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या, कोणत्याही व्यक्तीस, राज्य जन माहिती अधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस आत, संबंधित अपील प्राधिकाऱ्याकडे साध्या कागदावर जोडपत्र " ब " मध्ये दिलेलया नमुन्यात अपील दाखल करता येईल. अशा अपिलासोबत, ज्या विरुध्द अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाच्या एका प्रतीसह सार्वजनिक प्राधिकरणाला देय असलेली रुपये वीस इतकी अपील फी, रोख रकमेच्या स्वरुपात, तिची योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरुपात देण्यात येईल किंवा त्यावर वीस रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

(२) कलम १९ च्या पोट-कलम (१) खालील अपील प्राधिकाऱ्याला आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणतयाही व्यक्तीस, त्या अपील प्राधिकाऱ्याचा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे साध्या कागदावर जोडपत्र " क " मध्ये दिलेल्या नमुन्यात दुसरे अपील दाखल करता येईल. अशा अपीलासोबत, ज्या विरुध्द अपील दाखल करावयाचे आहे त्या आदेशाच्या एका प्रतीसह, राज्य माहिती आयोगाला देय असलेली रुपये वीस इतकी अपील फी रोख रकमेच्या स्वरुपात, तिची योग्य पावती घेऊन किंवा दर्शनी धनाकर्ष किंवा बँकेचा धनादेश या स्वरुपात देण्यात येईल किंवा त्यांवर वीस रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक चिकटविण्यात येईल.

## जोडपत्र-अ
## (नियम ३ पहा)
## माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मिळणेबाबतचा अर्ज

**प्रति,**

| येथे १० रुपयांचा कोर्ट फी स्टॅम्प लावावा. |
|---|

मा.जन. माहिती अधिकारी,

-------------------------------------

-------------------------------------

१) अर्जदाराचे नाव :- ----------------------------------------

२) पत्ता :- ----------------------------------------

फोन नंबर/मोबाईल नंबर- :- ----------------------------------------

३) आवश्यक असलेल्या महितीचा तपशिल :-

(एक) माहितीचा विषय * :-

(दोन) माहितीचा कालावधी # :-

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन $ :-

१)

२)

३)

(चार) माहिती टपालाने किंवा व्यक्तिशः :-

(पाच) जर टपालाने माहिती हवी असेल तर कोणत्या टपालाने हवी आहे. (साध्या, नोदणीकृत किंवा शीघ्र डाकेने)

४) अर्जदार दारिद्र्यरेषेखालील आहे किंवा कसे :-

ठिकाण :- अर्जदाराची सही

दिनांक :- / / २००

( )

---

* विषय ठळक स्वरुपात दर्शविण्यात यावा. (जसे. शासकीय जमिन देण/सेवाविषयक बाब/लायसेन्स, इत्यादी).

# ज्या कालावधीची माहिती आवश्यक असेल तो संबंध कालवधी दर्शविण्यात यावा.

$ आवश्यक असलेल्या माहितीचा विशेष तपशील दर्शविण्यात यावा.

जोडपत्र ब

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ याच्या कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील

प्रेषक,

------------------------------
------------------------------
------------------------------

येथे २० रुपयांचा कोर्ट फी स्टॅम्प लावावा

प्रति,

-------------------------------
-------------------------------
-------------------------------

१) अपिलकाराचे पूर्ण नांव -

२) अपिलकाराचा पूर्ण पत्ता -

फोन / मोबाईल नंबर -

३) राज्य शसकीय माहिती अधिकाऱ्याचा तपशिल -

४) ज्या आदेशाविरुध्द अपील केले असेल तो आदेश प्राप्त झाल्याची तारीख (आदेश दिलेला असेल तर) -

५) अपील दाखल करण्याची शेवटची तारीख -

६) अपीलाची कारणे -

७) माहितीचा तपशिल -

(एक) आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरुप व विषय -

(दोन) माहिती ज्याच्याशी संबंधित आहे त्या कार्यालयाचे किंवा विभागाचे नांव -

ठिकाण -

दिनांक - / /

अपीलकाराची सही

दुसरे अपील

**जोडपत्र क**

[नियम ५ (२) पहा.]

| |
|---|
| येथे २० रु. चा न्यायालय फी मुद्रांक चिकटवावा |

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याच्या कलम १९ (३) खालील अपील

प्रेषक ----------------------------------------------

(अपीलकाराचे नाव व पत्ता)

प्रति

---------------------------

(१) अपीलकाराचे संपूर्ण नाव :

(२) पत्ता :

(३) राज्य जन माहिती अधिकाऱ्याचा तपशील :

(४) पहिल्या अपील प्राधिकाऱ्याचा तपशील :

(५) ज्या आदेशाविरुध्द अपील केले आहे तो आदेश मिळाल्याचा दिनांक. :

(६) अपील दाखल करण्याचा अंतिम दिनांक :

(७) अपिलाची कारणे :

(८) माहितीचा तपशील :

(एक) हव्या असलेल्या माहितीचे स्वरुप आणि विषय

(दोन) माहिती ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित आहे त्याचे नाव. :

ठिकाण :

दिनांक : अपीलकाराची सही.